**नियमित दिवाणी दावा क्र.२१२/२०२३**

(धनाजी कदम वि. मारुती कदम वगैरे)

**CNR No.MHSO07-000251 -2023**

## निशाणी क्र.२६ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.२ व ७ यांनी त्यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादींच्या कथनानुसार, याकामी जुन्या कागदपत्रांच्या नकला वेळेत मिळाल्या नसल्याने त्यांना मुदतीत कैफियत दाखल करता आले नाही. सबब, त्यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येऊन त्यांनी अर्जासोबत दाखल केलेले कैफियत स्वीकारण्यात यावे अशी त्यांनी विनंती केली आहे.

३. वादीने प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. प्रकरणाचे अवलोकन केले असता हे स्पष्ट आहे की, प्रतिवादींचे देखील हक्क हितसंबंध दाव्यात गुंतलेले आहेत. त्यामुळे त्यांना त्यांच्या बचावाची संधी देखील मिळणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादींच्या विनंतीनुसार कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ न केल्यास आणि त्यांना त्यांचे कैफियत दाखल करण्याची परवानगी न दिल्यास त्यांचे अपरिमित असे नुकसान होईल. परंतू तशाप्रकारे परवानगी दिली गेल्यास वादीवर कुठलाही अन्याय होत नाही. उलटपक्षी दावा गुणदोषावर निकाली करण्यास त्याची मदतच होते. त्यामुळे खालील आदेशाद्वारे प्रस्तुतचा अर्ज निकाली करण्यात येत आहे.

### आदेश

१. अर्ज रक्कम रुपये २००/- खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादींनी खर्चाची रक्कम वादीला पुढील तारखेपर्यंत दयावी.

३.  प्रतिवादींनी वरीलप्रमाणे खर्चाची पूर्तता केल्यानंतर त्यांनी अर्जासोबत दाखल केलेले कैफियत अभिलेखावर घेण्यात यावे.

Priyanka Namdev Pathade

Digitally signed by Priyanka Namdev Pathade
Date: 2023.11.30 17:46:33 +0530

(पी. एन. पठाडे)

दिनांकः– २९.११.२०२३  ४थे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पंढरपूर

## Certificate

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | S. S. Tupdauru |
| Court | - | 4th Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Pandharpur |
| Date of Judgment/Order | - | 29.11.2023 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 29.11.2023 |
| Judgment/Order uploaded on | - | 30.11.2023 |